सं.फौ.ख.क्र २४९/२०२५
शासन -वि- विवेक
**(नि.क्र.०७)**

## सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की–

माझे नाव :– गोपाळ गजाननराव झटाले,

वय :– ४६ वर्षे,

व्यवसाय :– पो.हे.कॉ., पो.ठा.परतवाडा,

राहणार :– परतवाडा, ता. अचलपुर, जि. अमरावती .

----

**सरतपासणी सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता श्री. आय. वाय. पठाण यांच्यामार्फत**

१. दिनांक २९.१२.२०२४ रोजी मी पोलीस ठाणे परतवाडा येथे पोलीस हे. म्हणुन कार्यरत होतो. सदर दिवशी आम्ही मिश्रा चौक, परतवाडा येथे वाहतुक बंदोबस्तासाठी थांबलो होतो. त्यावेही एक इसम त्याची दुचाकी आडवी–तेडवी चालवित असतांना सदर ठिकाणी दिसुन आला. सदर इसम आज न्यायालयात हजर आहे. त्यास आम्ही थांबविले. त्याचे तोंडाचा आंबट वास येत होता. सदर आरोपीस त्याचे नाव व गाव विचारले असता त्याने त्याचे नाव विवेक कळसकर, रा. कांडली, परतवाडा असे सांगितले. आम्ही त्याच्या वाहनाचा नोंदणी क्रमांक व वाहनाचा प्रकार पाहिला. त्यानंतर त्यास वैद्यकीय तपासणीसाठी उपजिल्हा रुग्णालय अचलपुर येथे पाठविले. त्याचा वैद्यकीय अहवाल हा सदर इसम दारु पिलेला आहे असा आला. त्यामुळे मी पोलीस ठाणेत येवुन प्रस्तुत आरोपीविरुध्द फिर्याद दाखल केली. आता मला सदरची फिर्याद दाखविण्यात आली. आता मला सदरचा रिपोर्ट दाखविण्यात आला. त्यावरील स्वाक्षरी माझी आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर रिपोर्ट यास **नि.क्र.०८** देण्यात येते. प्रथम खबरी अहवालास **नि.क्र.०९** देण्यात येते.

**अभियोग पक्षातर्फे सरतपास संपला.**

**<u>साक्षीदाराचा उलटतपास आरोपीचे विधीज्ञ श्री. एस. एस. राठोड वकील यांच्यामार्फत</u>**

२. आम्ही घटनास्थळी घटने दिवशी जाणे पुर्वी पोलीस ठाणे नोंद वहीस नोंद केली होती. सदर दिवशी माझे कर्तव्याचे काम हे वाहतुक नियंत्रण हेच होते. हे म्हणणे खरे आहे की, मिश्रा चौक हा वरदळीचा भाग असुन तेथे बरेचशा वाहनांची वरदळ असते. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही रस्त्यावरील प्रत्येक व्यक्तीची नोंद ठेवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी परीचयाच्या पंचांच्या पंचनाम्यावर स्वाक्षऱ्या घेतलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासात आरोपीविरुध्द कार्यवाहीबाबतचा मजकुर खोटा सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या पोलीस ठाणेतील प्रकरणांचो आव्हान टार्गेट पुर्ण करण्यासाठी मी आरोपीविरुध्द खोटी फिर्याद, दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

Sd/-
(सी. एस. देशपांडे)
प्रथमवर्ग न्योयदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२, अचलपूर

ठिकाण :- अचलपूर.
दिनांक :- २५/०२/२०२६.